महाराष्ट्र शासन

इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई

कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर - ४४० ०२२
दुरध्वनी क्र. ०७१२-२८७०१२०/२१ CIN - U85300PN2019NPL187405 ई-मेल - mahajyotingp@gmail.com

जा.क्र.महाज्योती/नागपूर/आस्था/३०६/२०२५-२६ दिनांक :-२३/०२/२०२६

# परिपत्रक

**विषय :- संघ लोकसेवा आयोग महाराष्ट्र येथील परीक्षा पूर्व प्रशिक्षण २०२५-२६ करीता प्रतिक्षा यादी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याबाबत.**

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात महाज्योती संस्थेमार्फत राबिण्यात येणाऱ्या संघ लोकसेवा आयोग महाराष्ट्र येथील परीक्षा पूर्व प्रशिक्षणाकरिता पात्र विद्यार्थाची विस्तारित यादी महाज्योतीच्या संकेतस्थळावर दि.२३/०१/२०२६ रोजी प्रसिध्द करून निवड झालेल्या विद्यार्थाना संबंधित प्रशिक्षण संस्थेत रुजू होण्याकरिता दि.१०/०२/२०२६ रोजी पर्यंत मुदत देण्यात आलेली होती. तसेच जे विद्यार्थी दि.१०/०२/२०२६ रोजी पर्यंत प्रशिक्षण संस्थेत रुजू होणार नाही अश्या विद्यार्थांचे प्रवेश रद्द करून पुढील प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात येईल असे देखील कळविण्यात आले होते.

त्यानुसार संबंधित प्रशिक्षण संस्थेमार्फत प्राप्त अहवालानुसार विस्तारित यादीतील निवड झालेल्या विद्यार्थापैकी ज्या विद्यार्थानी प्रवेश प्रकिया पूर्ण केलेली नाही अश्या विद्यार्थाचे प्रवेश रद्द करण्यात आलेले असून रिक्त असलेल्या जागांकरिता पुढील प्रतिक्षा यादीतील विद्यार्थांची निवड करून सदर प्रशिक्षणाकरिता प्रतिक्षा यादी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करून निवड झालेल्या विद्यार्थांना युनीक अकॅडेमी, पुणे या प्रशिक्षण संस्थेत दि.२८/०२/२०२६ रोजी पर्यंत रुजू होण्याकरिता सूचना निर्गमित करण्यात येत आहे. **जे विद्यार्थी दि.२८/०२/२०२६ रोजी पर्यंत प्रशिक्षण संस्थेत रुजू होणार नाही अश्या विद्यार्थांचे प्रवेश रद्द करून पुढील प्रतिक्षा यादीतील विद्यार्थांची निवड करण्यात येईल**. सर्व संबंधित विद्यार्थांनी याची नोंद घ्यावी.

**स्वा**
**(मिलिंद नारिंगे)**
**व्यवस्थापकीय संचालक**
**महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था,**
**(महाज्योती) महाराष्ट्र राज्य, नागपूर**